राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ परीक्षा दिनांक २१ जानेवारी, २०२३

2022

**U16**

# भाषा पेपर क्र. – 1 / Language Paper - 1

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा**
**Standard : H.S.C.**

**एकूण गुण : 100**
**Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक**
**Nature of Paper : Conventional type**

**कालावधी : 3 तास**
**Time allowed : 3 hours**

---

***सूचना*** */ Note :*

*(i)* *उमेदवाराने* ***भाग - 1*** *मराठी व* ***भाग - 2*** *इंग्रजीकरिता* ***दोन स्वतंत्र उत्तर-पुस्तिका*** *वापरावी.*
*Candidates should use* ***two separate answer-books*** *for* ***Part-1*** *Marathi and* ***Part-2*** *English.*

*(ii)* ***सर्व*** *प्रश्न सोडविणे* ***आवश्यक*** *आहे.*
***All*** *questions are* ***compulsory****.*

*(iii)* *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

*(iv)* *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

*(v)* *उत्तर-पुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer-book otherwise he/she will be penalised.*

*(vi)* *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If part of answer or sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

*(vii)* *उमेदवाराने* ***भाग - 1*** *मराठी या उत्तर-पुस्तिकेत* ***भाग - 2*** *इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच* ***भाग - 2*** *चे उत्तर-पुस्तिकेत* ***भाग - 1*** *(मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer* ***Part - 1*** *Marathi Question in* ***Part - 2*** *English answer-book and vice-versa, otherwise it will be overlooked.*

**P.T.O.**

## भाग - 1 मराठी ( अनिवार्य ) 50

1. खालीलपैकी **एका** विषयावर 400 शब्दांत निबंध लिहा. 25

   (a) नवे शैक्षणिक धोरण

   (b) प्रदूषणाचा भस्मासूर आणि जीवनमूल्यांचा ऱ्हास

---

2. इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 15

I have said that in some degree wisdom can be taught. I think that this teaching should have a larger intellectual element than has been customary in what has been thought of as moral instruction . I think that the disastrous results of hatred and narrow-mindedness to those who feel them can be pointed out incidentally in the course of giving knowledge. I do not think that knowledge and morals are to be too much separated. It is true that the kind of specialized knowledge which is required for various kinds of skills has very little to do with wisdom. But it should be supplemented in education by wider surveys calculated to put it in its place in the total of human activities. Even the best technicians should also be good citizens and when i say 'Citizens', I mean citizens of the world and not of this or that sect or nation. With every increase of knowledge and skill, wisdom becomes more necessary, for every such increase augments our capacity for realizing our purposes, and therefore augments out Capacity for evil, if our purposes are unwise. The world needs wisdom as it has never needed it before, and if knowledge continues to increase, the world will need wisdom in the future even more than it does now.

---

3. पुढील उताऱ्याचे $\frac{1}{3}$ शब्दांत सारांश-लेखन करा आणि त्याला योग्य असे शीर्षक द्या. 10

भारत देशाचा अध:पात होण्याचे मूळ या देशातील तत्त्वज्ञानांत नाही तर ते तत्त्वज्ञानाच्या विपर्यासात आहे. बुद्धि गहाण ठेवली जाऊन पोथीनिष्ठा, व्यक्तिनिष्ठा व पंथनिष्ठा वाढत गेली आणि स्वार्थी व धूर्त लोकांनी सर्वांच्या हिताऐवजी स्वत:च्या सुखाचा विचार दृष्टीसमोर ठेवून विचका करून टाकला. उदारमतवादीपणामुळं शेकडो मतांना वाव देतांना प्रत्येक मताचा गट पडत गेला; शेकडो पंथ, जाति व धर्मसंप्रदाय फोफावत गेले आणि समाजाची शक्ति छिन्नभिन्न होत गेली. नवनव्या पंथाची भर पडत गेली; पण सर्वांनी कुठं तरी एकत्र यावं नि आपलं बंधुत्व ओळखावं, सर्व पंथमतांना कुठं तरी एका ध्येयात विलीन करावं नि देशकालपरिस्थितीचा विचार करून आज अनावश्यक किंबहुना बाधक ठरणाऱ्या पंथमताचं व रुढ्यांचं विसर्जन करून टाकावं, हा विचार मात्र शिल्लक राहिला नाही. त्यामुळं प्रत्येक गट अलग झाला, इतकचं नव्हे तर आपापल्या पात्रावर पोळी ओढण्यासाठी किंवा आपापल्या प्रतिष्ठेसाठी भांडू लागला. अशा रीतीनं सारा समाज शक्तिहीन, मानव्यरहित व आपसांत डोकी फोडणारा बनून आयताचं दुसऱ्यांच्या घशांत गेला. सामान्य जनतेला सर्वांगीण विकासाचं शिक्षण देण्याऐवजी त्याला मूर्ख ठेवून राबवून घेणं हेच बहुतेकाचं धोरण बनत गेलं व अशा रीतीनं एकदा उंच शिखरावर नांदलेला भारत देश पूरा गर्तेत गेला. या पडत्या काळातहि या देशांत अत्यंत मोठमोठी माणसं, अनेक वीर, संत व गुणज्ञ पुरुष होऊन गेले; तरी पण या जातिजातीच्या व पंथापंथांच्या फुटाफुटीमुळं त्यांना आपल्या इच्छेनुसार कामं करतां आलं नाही; सामान्य लोकांतील भ्रामक संस्कारांमुळं त्यांना पाहिजे ती दृष्टि पाहिजे त्या प्रमाणांत लोकांत रुजवता आली नाही आणि अखेर त्यांनाही या गोंधळापुढं हातच टेकावे लागले.

आम्ही एका ईश्वराची लेकरं, 'एका देशाचे घटक व एका गावचे रहिवासी इतकी बंधुत्वभावना देखील नाही'; सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा इत्यादी सर्वच गोष्टी या फुटीर वृत्तीमुळं माकडांच्या हातांत कोलीत नि यादवांच्या हातात लव्हाळी मिळाल्याप्रमाणं सर्वांच्या नाशासच कारण झाल्या. लहान-लहान राज्ये स्थापन करून बळी तो कान पिळी या न्यायानं आपसांत वळण लागलं आणि व्यापक दृष्टीनं विचार करून सारा देशच सुखी व उन्नत करावयाचा ही कल्पना अगदी मागं पडली. (शब्दसंख्या: 294)

## PART - 2 ENGLISH (COMPULSORY) 50

1. Write an essay on **any one** of the following topics. 25

   (a) Save Water Save Life

   (b) Unity is Strength

---

2. Translate the following passage into English. 15

आज आपण सर्वजण प्लास्टिकच्या जगात वावरत आहोत असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत आपण प्लास्टिकच्या वस्तू वापरत असतो. सकाळी उठल्या बरोबर प्लास्टिकचा टूथब्रश हातात घेतो. नंतर दिवसभर प्लास्टिकच्या अनेक वस्तू आपण वापरत राहतो. प्लास्टिकच्या पिशवीतलं अन्न आपण खातो. प्लास्टिकच्या बाटलीतल पाणी आपण पितो. चहा पिण्याकरता प्लास्टिकचे कप वापरतो. आपल्या स्वयंपाक घरात प्लास्टिकचे डब्बे, प्लेट्स, चमचे अशा अनेक वस्तू असतात. बाजारातून येणारी प्रत्येक वस्तू प्लास्टिक बॅग मध्येच आपल्या घरात प्रवेश करते. शाळेत जाणारी मुलं-मुली प्लास्टिकच्या डब्यातच जेवायला नेतात व पिण्याच्या पाण्याची बाटली सुद्धा प्लास्टिकची असते. प्लास्टिक शिवाय आपलं जीवनच नाही. पण ह्या प्लास्टिकचा आपल्या स्वास्थ्यावर व आपल्या पर्यावरणावर किती वाईट परिणाम होतो याचा विचार आपण करत नाही.

प्लास्टिक मुळे जगात सर्वत्र खूप प्रदूषण निर्माण झालेले आहे. नदी मध्ये, समुद्रा मध्ये प्लास्टिकचा खूप मोठा कचरा जमा झाला आहे. ह्या मुळे पाणी दूषीत होतं. हेच पाणी आपण पीतो. ह्यानी आपल्या स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो. अनेक रोग आपल्याला होतात. कॅन्सर सारखे अनेक आजार जगामध्ये मोठ्या प्रमाणात वाढले आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे आपलं जीवन धोक्यात आलं आहे. जमीनीवर सर्वत्र प्लास्टिकच्या कचऱ्याचा ढीग आपल्याला दिसतो. प्राणी हा कचरा खातात व ह्यामुळे त्यांचा मृत्यू होतो. हे सर्व थांबण जरुरी आहे. ह्या साठी आपण प्रयत्न करायला हवा. आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सरकारने प्लास्टिकच्या पिशव्या, तसेच प्लास्टिकच्या वस्तुंवर बंदी आणणे गरजेचे आहे. प्लास्टिकच्या पिशव्या आता दैनंदिन गरज बनली आहे; पण ह्या पिशव्यांचा वापर टाळता येतो. प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी ज्यूट पिशव्या, कापडी पिशव्या, कागदी पिशव्या वापरण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.

पर्यावरण नष्ट होणे म्हणजे मानवी जीवनच नष्ट होणे आहे. हे आपल्याला अजूनही लक्षात आले नाही. ज्या पर्यावरणात आपण जगतो त्याचे रक्षण करणे आपली जबाबदारी आहे. स्वच्छ, शुद्ध वातावरण आपले आरोग्य व समाजाला स्वस्थ ठेवते. पर्यावरणाने मनुष्याला खूप काही दिले आहे. मानवाने सुद्धा पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे.

---

3. Write a precis of the following passage in about $\frac{1}{3}^{rd}$ of its original length, with a suitable title : **10**

Every body has some ambition in life. Some people want wealth and property. They want to lead a life of pomp and show. There are others who have a desire to rule and command. Some young men want to become great soldiers and win laurels in the battlefield. Some wish to become good teachers and serve the society. It is really a good thing to have some ideal or aim in life. A life without an aim is like a ship without a destination. But our ideal should also be noble. We must not be self-centered. On the other hand we must contribute something to the good of our motherland.

What sort of men and women are required for our country ? India of today needs the services of all kinds of men. Doctors, teachers, engineers, soldiers, labourers and businessman - all can serve their motherland in their own way. They must however, become honest and sincere workers. They should place the larger interests of the nation above their petty personal interests. The service to the nation is service to God.

India has always been a peace-loving country. She has never invaded any other nation. Our army is an army for defence and not for offence. We believe in the golden rule, "Live and let live". We do not need even an inch of the land of our neighbours. Our own land is enough for us. But if anyone tries to cause any harm, we should always be ready to protect our country.

(Total words : 245)

---

-oOo-